महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४३ वा | दिनांक : २८/०२/२०२५ | वार : शुक्रवार

## शरद पवारांच्या दोन मोठ्या नेत्यांना सरकारकडून पी.ए.



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर जयंत पाटील हे भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र जयंत पाटील यांनी पक्ष प्रवेशाची चर्चा फेटाळून लावली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्यानंतर जयंत पाटील भाजपच्या वाटेवर असल्याचे बोलले जात आहे. यावर या भेटीचा कोणताही राजकीय अर्थ काढू नका, असे जयंत पाटील यांनी म्हटले. सांगली जिल्ह्यातील महसूल संदर्भात काही प्रश्न होते, त्या संदर्भात निवेदन देण्यासाठी मी बावनकुळे यांची भेट घेतली, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली आहे. तसेच या भेटीवेळी माझ्यासोबत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माझा स्टाफ होता. या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

असे असले तरी या भेटीनंतर राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि नेते उत्तम जानकर यांना सरकारकडून पीए देण्यात आल्याचे समजते. इतकेच नव्हे तर या पीएंचा पगार देखील सरकारी तिजोरीतून देण्यात येणार असल्याचे समजते. या घटनांमुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, उत्तम जानकर यांनी ईव्हीएमच्या विरोधात मोठे आंदोलन केले होते तसेच निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची देखील त्यांनी मागणी केली होती. तसेच जयंत पाटील यांनी देखील विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमचा घोळ करण्यात आल्याचा आरोप केला होता. मात्र त्यानंतर आता या भेटीमुळे जयंत पाटील महायुतीमध्ये सहभागी होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महाराष्ट्रात सध्या महायुतीमधील घटक पक्षांमध्ये नेत्यांचे इनकमिंग सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटातून अनेक नेते व माजी आमदार हे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत आहेत. तसेच अमोल मिटकरी यांनी देखील अनेक आमदार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात अजित पवारांच्या नेतृत्वात प्रवेश करणार असल्याचा दावा केला आहे.

## आरोपींना सोडविण्यासाठीच १५०० पानांचे दोषारोपपत्र : प्रकाश आंबेडकर यांचा आरोप



**हिंगोली :** मस्साजोग प्रकरणातील आरोपींना सोडविण्यासाठीच पोलिसांनी दिड हजार पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले असावे, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी ता. २७ हिंगोली येथे बोलताना केला. हिंगोली येथे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्ता संवाद बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ज्योतीपाल रणवीर, शिवाजी खरात, राजू कांबळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

मस्साजोग प्रकरणात पोलिसांनी दिड हजार पानांचे दोषारोप पत्र दाखल केले, मात्र हे दोषारोप पत्र वाचण्यासाठी न्यायालयाला वेळ नाही अन विधिज्ञांनाही वेळ नाही. त्यामुळे दिड ते दोन हजार पानांचे दोषारोपपत्र आरोपींना सोडण्यासाठीच दाखल केले असावे. नीरव मोदी प्रकरणात भारतीय पोलिसांनी लंडनच्या न्यायालयात आठ हजार पानांचे दोषारोपपत्र व इतर कागदपत्र सादर केली होती.

सदर दोषारोपपत्र पाहून लंडनच्या न्यायालयाने भारतीय पोलिसांना चांगलेच झापले अन त्यांची बेअब्रू केली. तुम्ही न्याय मागायला आले की त्याला सोडवायला, एवढी पाने कधी वाचणार असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला होता. त्यामुळे दिड दोन हजार पानांचे दोषारोपपत्र दाखल झाल्यावर ते आरोपीला सोडण्यासाठीच दाखल केले असावे हे समजवावे असे त्यांनी सांगितले.

राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला भाजप व आरएसएस जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यांच्याकडून एका बाजूला धार्मिक वातावरण तयार केले जात आहे तसेच महिलांबद्दल केले जाणारे वक्तव्य यामुळे लोकांची मानसीकता खराब झाली असून महिलांवर अत्याचार वाढले आहे. या परिस्थितीला पूर्णपणे भाजप अन आरएसएस जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला.

## महावितरणला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार




**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात अमलात येणाऱ्या ऊर्जा परिवर्तन योजनेतील विशेष कार्यासाठी महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली येथे मंगळवारी आयोजित केलेल्या तेराव्या ग्रीन एनर्जी समिटमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

महावितरणला या प्रतिष्ठित परिषदेत 'स्टेट लेव्हल एक्सलन्स ॲवॉर्ड इन एनर्जी ट्रान्झिशन' या गटात पुरस्कार मिळाला. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून ऊर्जा परिवर्तन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नवी दिल्ली येथील पुरस्कार सोहळ्यात महावितरणचे कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता नीलकमल चौधरी आणि अधीक्षक अभियंता संजय वाघमारे यांनी पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाचे अध्यक्ष अनिलकुमार जैन उपस्थित होते. तसेच ज्युरी मंडळाचे प्रमुख माजी केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान उपस्थित होते.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची वाढती गरज ध्यानात घेऊन राज्याच्या ऊर्जा क्षमतेत पाच वर्षात ४५ हजार मेगावॅटने वाढ करण्यात येईल व ती ८१ हजार मेगावॅट होईल. ऊर्जा परिवर्तन योजनेनुसार महावितरणने नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. आगामी काळातील वापरासाठी करण्यात आलेल्या वीज खरेदी करारांमध्ये प्रामुख्याने हरित ऊर्जेचे करार आहेत. यामुळे २०३० मध्ये राज्याचा हरित ऊर्जा वापर सध्याच्या १३ टक्क्यांवरून वाढून ५२ टक्क्यांवर जाईल.

पर्यावरण रक्षणासोबतच वीजखरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. यामुळेच महावितरणने राज्य विद्युत आयोगासमोर वीजदर निश्चितीसाठी दाखल केलेल्या याचिकेत आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने विजेचे दर कमी करण्याची अनुमती मागितली आहे. तसेच महावितरणने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० या योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल. राज्यात या योजनेची अंमलबजावणी गतीने सुरू आहे. आगामी वर्षामध्ये या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर म्हणजेच हरित ऊर्जेवर चालविण्यात येणार आहेत. या योजनेत १६ हजार मेगावॅटची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता विकसित करण्यात येत असून ऊर्जा परिवर्तनामध्ये या योजनेचा महत्त्वाचा वाटा आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५


# आनंदनगर मुरुम येथे रोटरी क्लब तर्फे सर्वरोग आरोग्य शिबिर संपन्न



आनंदनगर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत सर्व रोग निदान शिबिराप्रसंगी डॉक्टर्स रुग्णांची तपासणी करताना रुग्ण व अन्य.

**मुरुम, ता. उमरगा, ता. २७ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील रोटरी क्लब मुरुम सिटी, ग्रामीण रूग्णालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आनंदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदनगर शाळेत महिला-पुरूष व विद्यार्थ्यांची सर्वरोग निदान आरोग्य शिबिर रोटरी डे व महाशिवरात्रीचे औचित्य साधुन गुरुवार (ता. २७) रोजी घेण्यात आले.

प्रारंभी रोटरी क्लबचे अध्यक्ष कमलाकर मोटे यांच्या हस्ते डॉ. तेजस्वीनी सोनवणे, डॉ. सागर काबरा, डॉ. गिरिष मिनियार, मुख्याध्यापक बाबुराव पवार यांच्या उपस्थितीत दंतचिकित्साचे प्रात्यक्षिक करुन करण्यात आले.

यावेळी नागरिक, विद्यार्थी यांची तपासणी करुन औषधे देण्यात आली. रोटरीचे संतोष कांबळे, प्रा. डॉ. अप्पासाहेब सुर्यवंशी, प्रा. राजकुमार वाकडे, कलप्पा पाटील, आरोग्य विभागाचे सुजित जाधव, वैष्णवी शिंदे, शिक्षक सुनिता खंडागळे, तानाजी बिराजदार आदींनी पुढाकार घेतला.

विद्यार्थ्यांना राजगिऱ्याचे लाडु वाटप करून संध्या पुजारी यांनी अभार मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# फतीयाबादमध्ये शिवजयंती साजरी



**पडेगाव :** येथून जवळच असलेल्या फतीयाबाद (शिवपूर )येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि २६ बुधवार रोजी साजरी करण्यात आली यावेळी आमदार सतीश चव्हाण, अजिंक्य प्रतिष्ठान चे अध्यक्ष विनोद पाटील,सर्जेराव चव्हाण माजी पंचायत समिती सभापती यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार सतिश चव्हाण यांनी सांगितले कीं छत्रपती शिवाजी महाराज हे कोणी एका जातीचे नव्हते तर ते अठरा पगड जातीचे,बारा बलुतेदार त्यांच्या सोबत होते राज्य हे त्यांच्या विचारधारे वर चालले पाहिजेत.

महिला साठी शासनाच्या विविध योजना आहे त्याचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटका पर्यंत पोहचायला हवा. तर विनोद पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कीं,छत्रपती शिवाजी महाराज यांची समाजाला शिकवण आहे कीं महिलांचे सम्मान व सरंक्षण केले पाहिजे.

तसेच महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्व महामानव यांच्या जयंती साजरी करण्यासाठी व त्यांचे ज्या ज्या ठिकाणी स्मारके आहे ते नियमित होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासन दरबारी स्मारके नियमित करण्याचे प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे समजपयोगी उपक्रम घेता येईल असे सांगितले.

यावेळी सरपंच नंदाबाई साठे,उपसरपंच छाया किशोर नाईक,अशोकराव गायकवाड, अविनाश सोनवणे, कृष्णा नाना राहाणे,विजय ,जनार्दन गवळी,देव साठे,गणेश शेलार,प्रभाकर शेळके,विलास ठीलारे,भारत भास्कर,संदीप नाईक,रामा सुराशे,बापू नाईक, रामसिंग सुलाने, गुड्डू पठाण,नंदकिशोर मुळे, नारायण कांबळे,प्रदिप सोनवणे,एकनाथ मुळे,विशाल जाधव,भगवान शेळके कैलास पाटील नाईक भानुदास शेळके नितीन गवळी आदिसह परिसरातील शिवप्रेमी व गावकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी गायकवाड यांनी तर प्रभाकर शेळके यांनी आभार मानले.

# कर्मवीर आ.मा.पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रतिमापूजन कार्यक्रम संपन्न ..!



## कुसुमाग्रजांनी मराठी भाषेच्या साहित्याविषयी सर्वसामान्य माणसांच्या मनात आदर निर्माण केला... प्राचार्य डॉ.एल.बी.पवार

**पिंपळनेर :** कुसुमाग्रजांनी कथा, कविता व कादंबरी च्या माध्यमातून साहित्याला एक उंची प्राप्त करून दिली. सामान्य माणसाच्या मनात साहित्य विषयी आदर निर्माण केला.

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य असा एक भाग आहे. मराठी भाषेच्या माध्यमातूनच कुसुमाग्रजांनी आपले साहित्य सर्व दूर पोहोचविले. असे मत मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.एल.बी.पवार यांनी व्यक्त केले.यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के , प्रा.एल.जे.गवळी आदी उपस्थित होते.

कर्मवीर आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रम घेण्यात आला.पुढे बोलताना डॉ. सतीश मस्के म्हणाले की, भारतातील बाबीस भाषांपैकी मराठी ही एक भाषा अत्यंत महत्त्वाची आहे.

कुसुमाग्रजांनी साहित्याच्या माध्यमातून समाजात एक क्रांती घडवली. समाजात चेतना निर्माण केली त्याचबरोबर समाजामध्ये परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या साहित्यामधून मानवता,सामाजिक बांधिलकी ओसंडून वाहताना दिसते.

सामाजिक अन्याय व विषमता यावरही त्यांनी कडाडून हल्ला केला. कार्यक्रमाचे आभार मराठी विभागाचे प्रा.एल.जे.गवळी यांनी मानले. यावेळी विविध कार्यक्रमाच्या वेळी स्वच्छ अक्षरात फलक लेखनाच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करणारे कर्मवीर आनंदराव माणिकराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील चित्रकलेचे शिक्षक रमेश गावित सर यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक व प्राध्यापिकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५


## कुसुमाग्रज यांच्या साहित्याने दिशा दिली : डॉ. बाळासाहेब लिहिणार



**छत्रपती संभाजी नगर :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजित केले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे "वि. वा.शिरवाडकर यांचे साहित्यातील योगदान" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

त्यानिमित्त डॉ. बाळासाहेब लिहिणार बोलताना म्हणाले स्वतंत्र्यानंतर मराठी साहित्यात अमूलाग्र बदल झाला. साहित्यातील लिखानाची ढब बदलली, संत पंत आणि तंत साहित्याने भक्ती आणि परमेश्वर या अनुषंगाने समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला तर स्वातंत्रोत्तर कालखंडातील साहित्याने साहित्य लिखाणाची दिशाच बदलून टाकली.

प्रत्यक्षात समाज जगतो कसा? ते पात्र साहित्यात उतरविले समाजाच्या सुख दुःखाचे विषय घेऊनच लिखाण होऊ लागले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या साहित्यातून समाजाच्या वेदना मांडल्या जाऊ लागल्या. वि.वा. शिरवाडकर यांचा यात मोलाचा वाटा होता. शिरवाडकरांच्या साहित्यात पौराणिक साहित्यासोबतच वास्तव जीवन आले.

त्यांच्या लिखानामुळे प्रस्थापित साहित्य लेखकानी आपल्या साहित्याची दिशाच बदलून टाकली.,त्यांचे "नटसम्राट" "ययाति देवयानी" ही नाटके देशभर गाजले. देवाचे घर, नाटक बसते आहे, बेकेट,महंत मुख्यमंत्री,राजमुकुट, विदूषक,ही नाटकें.

वीज म्हणाली धरतीला, कल्पनेच्या तीरावर, जान्हवी, वैष्णवया कादंबऱ्या.एकूण शिरवाडकरांनी साहित्यात त्यांचा स्वतःचा वेगळाच ठसा उमटावला. मराठी भाषा दिन साजरा करण्याचे महत्व त्यांच्या साहित्याचे वाचन केल्यानंतर नक्कीच येईल असे डॉ लिहिणार यानी म्हटले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे सरांनी मराठी भाषा समृद्धी साठी काही उपाय योजना आखता येतील का याचा विचार व्हावा असे सुचवून वाचन संस्कृती विद्यार्थ्यांनी वाढवावी अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी केले संचालन विद्यार्थीनी कु.भाग्यश्री पठाडे हिने केले व आभार विद्यार्थीनी शिवानी काकडे हिने मानले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयातील डॉ. किशोर काळे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुरस्कार मिळाला म्हणून सत्कार केला.

या कार्यक्रमासाठी प्रा.हरिदास होळकर डॉ.कालिदास फड,डॉ. नरेश डहाळे डॉ.अश्विनीकुमार चिंचोलीकर,डॉ.लक्ष्मण दांडगे,डॉ. पठाण,प्रा. लक्ष्मण खरात,डॉ.लावंड प्रा.शिंदे आदी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभागाचा नाविन्यपूर्ण उपक्रम..



**जालना :** प्राचार्य डॉ.एस.डी. तळेकरमराठी भाषेला व साहित्याला नुसताच दीर्घ वारसा नाही तर समृद्ध अशी सांस्कृतिक परंपरा देखील आहे. मराठी भाषेला केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा आता जरी दिला असला तरी मराठी ही प्राचीन काळापासून अभिजात दर्जाची भाषा आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर यांनी केले.

येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभागाच्या वतीने मराठी साहित्यातील श्रेष्ठ व ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज उर्फ वि वा शिरवाडकर यांच्या जयंती निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी प्राध्यापकांच्या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर हे होते तर विशेष उपस्थिती म्हणून महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. विद्या पटवारी या होत्या. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक डॉ. विजय नागोरी डॉ.जितेंद्र अहिरराव, डॉ.स्वाती महाजन, डॉ.सुधाकर वाघ, आयक्यूएससी समन्वयक तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.वासुदेव उगले यांची विशेष उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ.तळेकर म्हणाले की, कवी कुसुमाग्रजांचे योगदान मराठी भाषेसाठी अतुलनीय आहे.

मराठी भाषा ही मुळातच अभिजात भाषा आहे. मराठी भाषेला अभिजाततेचा दीर्घ वारसा लाभलेला आहे. मध्ययुगीन संतांनी मराठी भाषेला खऱ्या अर्थाने अभिजात करण्यासाठी व तिचा लौकिक पातळीवरील व्यवहार वाढविण्यासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे.

आता ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे की मराठी भाषा अधिकाधिक लोकांच्या व्यवहारात कशी आणता येईल. मराठी भाषेचा अभिजात दर्जा सामान्य माणसाच्या गळी उतरविण्याचे आव्हान मराठी भाषिक म्हणून आपल्या सर्वांसमोर आहे.

मराठी भाषेचे सौंदर्य व लालीत्य हे अनेक पर धर्मीयांनाही मोहित करणारे ठरले आहेत. त्यामध्ये संत शेख मोहम्मद संत फादर स्टीफन्स अशा काही संतांचा विशेष उल्लेख करता येईल.

मराठी भाषा ही अत्यंत अल्हाददायक असून तिचा मोह सर्वांनाच झालेला आहे हे इतिहास सांगतो. असेही ते यावेळी म्हणाले. कुसुमाग्रजांची कणा कविता सादर करून कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी संमेलनाला रीतसर सुरुवात केली.

यानंतर बी.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी दीक्षा निकम, श्रेया वरखडे यांच्या सुंदर रचनांनी काव्य मैफलीचा सुरुवात करण्यात आली. यानंतर डॉ. विद्या पटवारी यांनी शब्द कविता सादर करून सर्वांच्या टाळ्या मिळविल्या.

यानंतर लगोलग डॉ. विजय नागोरी, डॉ. जितेंद्र अहिरराव, डॉ. सुधाकर वाघ, पार्वती देशमुख, राहुल अंभोरे, डॉ. केशव सोळंके, डॉ. जयश्री वाडेकर, डॉ. अंजू कुलकर्णी, साईलीला पारिक, पापाजी चव्हाण, दीक्षा आनंद, राहुल हिवाळे, सचिन शेवतेकर, शीला कवडे, प्रवीण घुगे, डॉ. वासुदेव उगले अशा सर्वच प्राध्यापकांनी चढाओढीने वेगवेगळ्या रचना सादर केल्या.

महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या नव उपक्रमाचे प्रास्ताविक आयक्यूएससी समन्वयक तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.वासुदेव उगले यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रवीण घुगे यांनी केले तर प्रा शीला कवडे यांनी सर्व उपस्थित यांचे आभार प्रकट केले.----------

## महिला महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. डॉ. प्रतिभा धोंडकर) :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संविधान गौरव महोत्सव अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्विकारण्यात आला. या घटनेला दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करण्यात आला.

दि. २५ फेब्रुवारी रोजी 'भारतीय राज्यघटनेची ओळख' या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली होती. यात ३० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. तसेच दि. २७ फेब्रुवारी रोजी भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. यात ५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनल श्रीगीरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५


## राज्यस्तरीय शालेय स्पीडबॉल क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५ चे आयोजन



**जळगांव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगांव , महाराष्ट्र व जळगांव जिल्हा स्पीडबॉल असो. यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तर शालेय स्पीडबॉल क्रीडा स्पर्धा सन २०२४_२५ चे आयोजन दिनांक १९ ते २१ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तालुका क्रीडा संकुल चाळीसगाव, जळगांव येथे संपन्न झाल्या आहेत.

या राजस्तर शालेय स्पीडबॉल स्पर्धेसाठी यजमान नाशिक, कोल्हापूर, पुणे, मुंबई, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नागपूर या आठ ही विभागातील मुले व मुली खेळाडू सहभागी झाले होते. १४ ,१७ व १९ वर्षाखालील मुले व मुली वयोगटात सुपर सोलो , सिंगल, डबल्स व सोलो रिले या क्रीडा प्रकारात स्पर्धा संपन्न झाल्या आहेत.

सदर राज्यस्तर शालेय स्पीडबॉल क्रीडा स्पर्धेचे उदघाटन मा. रविंद्र नाईक सो जिल्हा क्रीडा अधिकारी जळगांव यांचे शुभ हस्ते तसेच मा. गोकुळ तांदळे माजी जिल्हा क्रीडा अधिकारी, मा. जगदीश चौधरी तालुका क्रीडा अधिकारी चाळीसगाव, ज्ञानेश काळे काळे सरचिटणीस महाराष्ट्र स्पीडबॉल असो.

सचिन निकम क्रीडा अधिकारी जळगांव, मा. अजय देशमुख अध्यक्ष, प्रवीण शिंदेराहुल साळुंखे सचिव जळगांव जिल्हा स्पीडबॉल असो.यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाले.

या स्पर्धेत यजमान नाशिक विभागाने सर्वसाधारण विजेतपद मिळविले.

या स्पर्धेत रामा रणदिवे पुणे, अविनाश रोमन सातारा, पवन खोडे, अभिजीत देशमुख नाशिक, दशरथ जाधव जळगाव, कु.सेजल भोसले प्रविण शिंदे, छत्रपती संभाजीनगर, नितिन जाधव अमरावती, आशिष देशपांडे नागपूर, सुप्रिया मॅडम मुंबई, संतोष पाटील नांदेड यांनी तांत्रिक समिती व पंच म्हणून काम केले .

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मा. अजय देशमुख मा. राहुल साळुंखे व सर्व टीम जळगांव जिल्हा स्पीडबॉल असो. यांनी केले आहे.

या स्पर्धा अतिशय उत्तम आयोजन केले त्याबद्दल मा . नितिन जी वाघमोडे साहेब IRS आयकर आयुक्त पुणे, अध्यक्ष महाराष्ट्र स्पीडबॉल असो. मा.रविंद्र नाईक, सो.जिल्हा क्रीडा अधिकारी जळगांव मा. इंद्रजीत नितनवार कार्याध्यक्ष, मा. पुरुषोत्तम जगताप व मा.अशोक सरोदे उपाध्यक्ष मा. प्रविण काळे खजिनदार यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगांव, महाराष्ट्र स्पीडबॉल असो. व जळगांव जिल्हा स्पीडबॉल असो. यांचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन केले.

## वैजापूर तालुक्यातील केंद्रावर परिक्षेत सर्रास कॉप्या



**छत्रपती संभाजीनगर :** वैजापूर तालुक्यातील निमगाव येथील कल्पतरू कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा जीवशास्त्राचा पेपर सुरू असताना श्रीमती अश्विनी लाठकर (शिक्षणाधिकारी, माध्यमिक) जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या भरारी पथकाने भेट दिली. यावेळी केंद्रावर मोठ्या प्रमाणात परीक्षा उपयोगी साहित्य, गाईड, स्पार्क गाईड, मायक्रो झेरॉक्स, नवनीत व इतर साहित्य इमारतीच्या बाजूस व एका विद्यार्थ्याकडे आढळून आले. यावेळी भरारी पथकाने संस्था अध्यक्ष व सचिव तसेच केंद्र संचालक व १५ पर्यवेक्षक यांच्यासह संबंधित विद्यार्थ्यावर कॉपी गैरमार्गप्रकरणी कारवाई केली आहे.

फुलंब्री येथील पिंपळगाव वळण येथील प्रकरण ताजे असतानाच शिक्षण विभागाच्या भरारी पथकाने आज वैजापूर येथील कल्पतरू कनिष्ठ महाविद्यालय निमगाव येथे अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान पथकास इमारतीच्या आजूबाजूला परीक्षा दालनाबाहेर कॉपी तसेच परीक्षा उपयोगी साहित्य गाईड, मायक्रो झेरॉक्स इत्यादी गैरप्रकारातील साहित्य आढळून आले. पथकाने केंद्रात प्रवेश करताच विद्यार्थ्यांनी परीक्षा दालनाबाहेर कॉप्यांचा वर्षाव केला. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शाळेचे प्रशासन केंद्र संचालकासह १५ पर्यवेक्षक यांनी विद्यार्थी तपासणी अक्षम्य दुर्लक्ष केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई केली. तसेच जीवशास्त्राच्या पेपरसाठी नवनीत गाईड कॉपी म्हणून बाळगल्या प्रकरणी एका विद्यार्थ्यावर देखील कारवाई करण्यात आली आहे.

याप्रकरणी संस्था अध्यक्ष, सचिव, केंद्र संचालक पर्यवेक्षक यांच्यावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच अध्यक्ष विभागीय शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार तात्काळ गुन्हा नोंदविण्यासाठी गटशिक्षणाधिकारी (पंचायत समिती वैजापूर) यांना श्रीमती अश्विनी लाठकर (शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर) यांनी आदेशित केले आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करून समिती अहवालातून मिळालेल्या माहितीच्या आधारावर संस्था तसेच केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर म्हणाल्या, आज इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र विषयाच्या पेपरला कल्पतरू कनिष्ठ महाविद्यालय निमगाव तालुका वैजापूर येथे शिक्षण विभागाच्या भरारी पथकाने भेट दिली असता या परीक्षा केंद्राचे केंद्र संचालक पर्यवेक्षक तसेच अध्यक्ष व सचिव यांनी परीक्षा संचलन कर्तव्य सूचीमधील नमूद कर्तव्यात कसूर तसेच शासनाची दिशाभूल करून फसवणूक केल्याप्रकरणी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वैजापूर यांना संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची लेखी आदेश देण्यात आली आहे. याप्रकरणी एका विद्यार्थ्याबरोबर देखील कॉपी गैरमार्ग प्रकरणी कारवाई करण्यात आलेली आहे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५


# व्यवस्थेशी झुंज देणाऱ्या कर्मयोगी शिक्षकाचे स्वकथन 'जागरण'




अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे शिक्षक, बहुआयामी साहित्यिक भारत सातपुते हे माझे जुने सन्मित्र आहेत. त्यांनी अध्यापन करत असताना अनेक तेजस्वी विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवल्या आहेत.त्यांचे जागरण नावाचे स्वकथन नुकतेच प्रकाशित झाले. गोंधळ घालून जागरण करून चरितार्थ चालवणाऱ्या गरीब परिवारात या गुणी माणसाचा जन्म झाला.

नोकरी करताना समाजात जीवन व्यतीत करताना त्यांनी प्रखर स्वाभिमानला धक्का लागू दिला नाही .भारत सातपुते या भारत देशातील महाराष्ट्रात जन्मलेले थोर भूमिपुत्र आहेत .साहित्यातील आपण अनेक लाचार ,लबाड, भंपक,वाचाळ लोक पाहताना सातपुते मात्र प्रज्ञावंत, विनम्र वृत्तीचे लेखक आहेत .बरं बोलण्यापेक्षा कधीही खरं बोलावं हे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. कवी, कथाकार, समीक्षक, गीतकार ,वात्रटिकाकार ,स्वकथन असे सर्व प्रकार त्यांनी सहजतेने हाताळले आहेत .सूत्रसंचालनात तर त्यांना ख्याती प्राप्त आहे .शब्दांच्या घनाने मस्तवाल वाकवता येतो...

मशाल पेटली की अंधार फाकवता येतो.....(ठिणगी) या शब्द सामर्थ्यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. सातत्याने समज येईपर्यंत दु:ख दारिद्र्याचे तप्त चटके सोशले आहेत. त्यामुळे त्यांनी शिक्षक म्हणून फक्त बंद खोलीत अध्यापन केले नाही, त्यांनी लेखक म्हणून लोकशिक्षकाची भूमिका घेऊन समाजाचे ऊर्जावान मूल्य जागरण केले.

अन्याय ,अत्याचार ,विकृतीवर शब्दवाणीने प्रहार केला .भारत सातपुते यांच्यासारखे शिक्षक लाभायला भाग्य लागते .ज्या मुलांना ते लाभले ती सर्व भाग्यवानच म्हणावी लागतील. भ्रष्टाचार निर्मूलन हा शब्द उच्चारून उच्चारून पार गुळगुळीत झाला तरी समाजातला भ्रष्टाचार संपलेला नाही. सातपुते नोकरीची तमा न बाळगता प्राथमिक शिक्षणातील भ्रष्टाचारावरही बेधडक प्रहार केला. भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यालाही सोडले नाही यासाठी लेखकाजवळ नैतिक बळ असावे लागते . तकलादू कारकून बनवणारी शिक्षण व्यवस्था त्यांना आवडली नाही. शिक्षकांवर लादलेल्या शैक्षणिक कामाचा त्यांनी विरोध केला.

भारत सातपुते श्रमजीवी आई वडिलांचे सुपुत्र आहेत .या श्रमजीवी विद्यापीठात त्यांनी संस्काराची ,मूल्यांची, नीतीनेमांचे शिक्षण घेतले. 'शाळेत गेलता का आज?, काय शिकवले ?' आई वडिलांच्या या दोन वाक्याने त्यांचे स्वत:चेही जीवन घडले.भारत सातपुतेच्या वाटेला मोठा संघर्षा आला.संघर्ष माणसाला खूप शिकवतो ,घडवतो मोठे करतो .भारत सातपुते नावाचं साहित्य क्षेत्रातील एक कलदार रसायन संघर्षातून घडले .जागरणमध्ये साहित्य प्रकाशनाचे अनेक किस्से आहेत. स्मृतीशेष विलासराव देशमुख हे सुसंस्कृत राजकारणी होते.

त्यांचे अफाट वाचन त्यांना अद्ययावत ठेवत होते. साहित्य संमेलनातील त्यांचेभाषण श्रोत्यांना पर्वणी ठरत असे.भारत सातपुते यांच्या अनेक पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या उपस्थित झाले. सातपुते यांच्या ' हे तिरंगी झेंड्या!' या कवितासंग्रहाचे प्रकाशन विलासरावजींच्यांया हस्ते होते. वेळ सकाळी ११ ची होती. ते सव्वा दहालाच येऊन धडकले.भारतने विचारले की,'एवढ्या लवकर कस काय सर?' यावर ते म्हणाले की कार्यक्रमाची तयारी बघायला आलो. थोर विचारवंत समीक्षक निर्मलकुमार फडकुले येत आहेत त्यामुळे त्यांचा योग्य सन्मान व्हायला हवा.

अस्मादिकांच्या गाजलेल्या वज्रमुठ या कवितासंग्रहाला डॉ. फडकुले यांची ऊर्जावान पाठराखण आहे. पण आमच्या करंट्या साहित्य महामंडळाने त्या थोर विचारवंताला अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळचे अध्यक्ष केले नाही. विलासराव फर्डे वक्ते होते .यशवंतराव चव्हाण तर लेखकापेक्षाही भारदस्त विचार मांडत. त्यांचं बोलणं साहित्याचं असे,तीच परंपरा विलासरावजींनी जिवंत ठेवली.

भारतरावचे व विलासरावजी यांचे खूप घनिष्ट संबंध होते. आपण कर्मठ, प्रामाणिक असल्याचं सातपुते यांनी सिद्ध केले. त्यांना भरपूर पैसे उकळता आले असते, त्यांची ही पवित्र पारदर्शक प्रांजलता वंदनीय आहे. कवी विनायक मिराशे म्हणतात ....काही खरे कराया उरला आता न कोणी मूल्यासवे मराया उरला आता न कोणी ....आपल्या आईचे सत्वशील दूध प्यालेले भारत सातपुतेने 'मी! मी उरलोय !!' हे कृतीने सिद्ध केलं.

लातूर येथील सर्व शिक्षा अभियान कार्यालयात अडगळीत पडलेली पुस्तकं शोधून ती सातपुतेने निलंगा येथे स्वखर्चाने नेऊन रजिस्टरमध्ये खतवली. विद्यार्थ्यांना वाचायला दिली. शिस्तप्रिय , स्वच्छतेचं काम करणारा शिक्षक असे करू शकतो. पुढाऱ्यांच्या दावणीला बांधलेली ,एक तारखेला पगाराची वाट पाहणारे ,शाळेत शिक्षण दिले जाते हे चक्क विसरलेले शिक्षकही कमी नाहीत .जिल्हा परिषदेच्या प्राथमिक माध्यमिक विभागात सर्वत्र आनंदी आनंद असतो .भारत सातपुते सारखा २४ कॅरेट शिक्षक कधीतरी सापडतो .विद्यार्थ्यांचा चौफेर विकास होतो .महाराष्ट्र ही गाडगेबाबा सारख्या विज्ञानवादी संत महात्म्यांची विचारवंतांची भूमी आहे .तरी इथले समाजमन का गुदमरत आहे ?. या चिंतेने प्रखर संवेदनशील भारत सातपुते हादरून गेले ,त्यांनी आपले आयुष्यच परिवर्तनाच्या विचारासाठी समर्पित केले.

अधिकारी वर्गाने त्यांचा पट पडताळणी, शाळा तपासणी, वस्तीगृह तपासणी ,कॉपीमुक्ती, भरारी पथक, गुणवत्ता वाढ इत्यादी अनेक कामासाठी उपयोग करून घेतला. या कामात ते कुठेही कमी पडले नाहीत त्यावरचा उपायही ते सुचवत गेले .त्यांना काही छुपे शत्रूही निर्माण झाले. त्यांच्यावर खोटे बनावटी बाळंत आले व सातपुते त्यांनी सत्याचा हमरस्ता कधी सोडला नाही .कटू अनुभव पचवण्याची सवय त्यांनी लावून घेतली .कवी कमलाकर देसले म्हणतात ....

अनुभवावा संघर्षाचा थरार मित्रा चढणे सरते तेव्हा येतो उतार मित्रा... शेळी नाही सिंहच आहे कळल्यावरती कोल्हे, कुत्रे भुकून झाले फरार मित्रा.... सातपुतेनी विरोधकांना लाजवून सोडले. त्यांच्यातल्या व्रतस्थ कर्मयोगी अध्यापक नमला नाही! तो अधिकच जोमाने झुंजत राहिला ...स्वच्छता तर सातपुतेना हवीच होती .शाळेच्या खोलीत पटांगणात स्वच्छता ठेवण्याचा उपक्रम यशस्वी केला. स्वत: सफाई करून इतरांना त्याची सवय लावली.

सुट्टीविना शाळा हा महाकठीण उपक्रम यशस्वी केला. 'भारत सातपुते है तो मुमकिन है।' हे मानायला भाग पाडले .परिपत्रका शिवाय जादा तास घेऊन मुलांचे कल्याण केले. मुलांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी विविध उपक्रम सुरू करून,' सुदृढ शरीरात सुदृढ मन बसते' हा भिंतीवरचा सुविचार प्रत्यक्षात उतरवला .शालेय समितीवर सदस्य म्हणून येणाऱ्यासाठीही ही कठोर नियमाची अंमलबजावणी करून दाखवली . ज्यांची मुले शाळेत त्यांनाच समितीचे सदस्यत्व देण्यात आले.दांडी मारणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाटणीवर आणले.

वशिलेबाज शिक्षकावर बडगा उगारला. प्रसुतीकाळात रजेवर जाणाऱ्या शिक्षिकेच्या वेळेवर पगार मिळायची चोख व्यवस्था केली. असे सर्व चमत्कार घडवण्यासाठी शिक्षकाच्या देहाला भारत सातपुते हे नाव धारण करावे लागते. बाणेदार ,कणेदार आणि स्वाभिमानी असावे लागते !जे मराठवाड्याचे 'कुसुमाग्रज' थोर कवी श्री दि.इनामदारांना वाटले ते भारत सातपुते नावाच्या जिंदा दिल शिक्षकाने प्रतृयक्षात उतरवले.श्री.दि. म्हणतात... सोन्यालाही सुगंध लाभे ज्ञानाला चांदणे माझी शाळा पहा बांधते विद्येला तोरणे सातपुतेनी अफाट श्रम घेऊन शाळेला गुणवत्तेचे वैभवी तोरण बांधले. अशी आजोड कामांची यादी मोठी आहे. हे स्वकथन जिल्हा परिषदेतील शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी, राजकारण भ्रष्ट कारभारावर बेधडक भाष्य करते.

भारत नावाच्या या धडपडणाऱ्या मुलाला या भारत देशातील लहान खेड्यात शिकण्यासाठी संघर्ष करावा लागला. भाकरीची शिकार करण्यासाठी पडतील ती कामे करावी लागली .नोकरीतील संघर्ष करावा लागला. बरं बोलण्यापेक्षा खरं बोलला म्हणून किंमत चुकावी लागली. शिक्षा भोगावी लागली . भारतने कवितेच्या क्षेत्रातही--कविता ममतेचा पंख गर्जनेचा शंख बंडांचा डंख असते....(ठिणगी पृ.3) हे सिद्ध करून दाखवलं त्याचे हे 'जागरण' व्यवस्था परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या कर्मयोगी शिक्षकाचे प्रबोधन पर दस्त-ऐवेज आहे.

जन्मदात्याचा आईभऊनी त्यांना जागरणाला जावू दिले नाही. स्वतः जागरण करून त्यांना शिक्षण दिलं म्हणूनच या स्वकथनात भारत सातपुतेनी आईभऊसह संबळ तुणतुण्याला सन्मान बहाल केला आहे. कविश्रेष्ठ श्री.दि. इनामदारांच्या भाषेत सांगायचे तर.....सूर्य उगवला उठा उठा रे प्रकाश दे हाकाआयुष्याच्या तेजावरती पाय पुढे टाका ...असा संदेश या स्वकथनातून कर्मयोगी शिक्षकाने दिला आहे. 'जागरण' मधून डंका वाजवणाऱ्या भारत सातपुतेना खूप-खूप शुभेच्छा! —


**डी.बी. जगत्पुरिया**

(छत्रपती संभाजी नगर )

९८ ६० ४८ ५३ ९८


# मानवी जीवनात कविता ही स्त्रियांची सुख-दु:खाची साक्षीदार असते : मंगल धुपे



***जालना ( प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** मानवी जीवनात कविता सुख-दु:खाची साक्षीदार असते, कळत नकळत ती स्त्रियांचे सुख - दु:ख जगासोबत समोर मांडत असते, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'काव्यधारा 'या महिला कवयीत्रींच्या कवी संमेलनामध्ये जालना जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे यांनी केले.महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा समिती जालना व जेईएस महाविद्यालय जालनाच्या मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने,मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'काव्यधारा'निमंत्रित महिला कवयित्रींचे कवी संमेलनाचे आयोजन दि. २७फेब्रुवारी २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजन केले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे या होत्या.

व्यासपीठावर निमंत्रित कवयित्री छत्रपती संभाजीनगरच्या प्रिया धारूरकर, जालन्यातील सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तळेगावकर, रेखा गतखणे ,वैशाली फोके ,कविता नरवडे ,रत्नमाला मोहिते, आरती सदावर्ते तसेच सत्यशीला तोर आदींची उपस्थिती होती.कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व मराठी भाषा गौरव गीत गायन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समिती सदस्य प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले ,यावेळी बोलताना ते म्हणाले की मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी साहित्यिकांच्या कार्यक्रमांचे आयोजन मराठी भाषा समितीतर्फे केले जाते.

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून, ती ज्ञानभाषा व्हावी, उच्च शिक्षणही मातृभाषेतूनच मिळावे. असेही प्रा.डॉ. सोनवणे यांनी सांगितले. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.यशवंत सोनुने यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जेईएस महाविद्यालयाची मराठी विभागाची कामगिरी व यशाची परंपरा मोठी असून, महाराष्ट्रातील मोठे विचारवंत व साहित्यिक या विभागाचे विद्यार्थी राहिलेले आहेत, तिच परंपरा आजही सुरू असल्याचे असेही डॉ. सोनुने यांनी सांगितले.काव्यधारा कवीसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना , श्रीमती मंगला धुपे म्हणाल्या की, कविता ही आयुष्यात सहज उलगडत जाणारी सुख-दु:खाची सखी आहे, कवितेतून मानवी जीवनातील सुखद व दु:खद प्रसंगाची आठवण होते, पुढे हीच कविता मानवी जगणं बनते असेही श्रीमती धुपे यांनी सांगितले.या उद्घाटन सत्राचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, मराठी साहित्यमध्ये विविध रंग दिसून येतात, स्त्रियांच्या कवितेविषयी बोलताना ते म्हणाले की, अव्यक्त ब्रह्म केवळ स्त्रियाच व्यक्त करू शकतात, कविता जीवनाला आकारच नव्हे तर आनंदही देते.

या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. विद्या मालानी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.बाबुराव श्रीरामे यांनी केले.दुसऱ्या सत्रामध्ये निमंत्रित कवयित्रींनी 'काव्यधारा' या कवीसंमेलनात आपल्या दर्जेदार अशा काव्य रचना सादर केल्यात. कविता नरवडे यांनी, 'किती पेटलेत ग आंदोलने..., मायबोली बोलली म्यानातली तलवार लढणार कधी...,कवयित्री 'आरती सदावत्रे सदावर्ते यांनी, कृष्णा शस्त्रे पुरव , नको पुरवू वस्त्रे,ही कविता सादर करून स्त्रियांचे दु:खांचे पदर व्यक्त केलेत. वैशाली फोके यांनी 'आमचं चाललंय मस्त, उभ्या पिंजऱ्याला जगणं बंदिस्त... ही स्त्रियांची व्यथा मांडणारी कविता सादर केली. कवयित्री रेखा गतखने यांनी,' खरंच जीवन सुंदर आहे, ध्येय ठेवून जगले पाहिजे.'

ही कविता सादर केली. कवयित्री रत्नमाला मोहिते यांनी, 'शरीर म्हातारे झालं तरी, मन म्हातारे झाले नाही ,माहेरच्या मायपनात, मी माय झाले...' ही स्त्रियांची जीवनावरील कविता सादर केली.छत्रपती संभाजी नगर येथील प्रसिद्ध कवयित्री प्रिया धारूरकर यांनी, 'पुन्हा पुन्हा तू पेरत गेली, सवेदनाचा झरा, संवेदनाचा झरा.. कवितेची गाणी काळजात रुतल्या, अक्षराच्या धारा... जालन्याच्या सत्यशीला तोर यांनी 'एक दिवस मन करून घट्ट बसते थक्क... सांभाळाया.. सांभाळाया. ' महिलांच्या वेदना दर्शवणारी दर्जेदार कविता सादर केली.जालन्यातील सुप्रसिद्ध कवयित्री डॉ .संजीवनी तळेगावकर यांनी 'काही हरवले, काही गवसले, मन कावरले,मन बावरले... तुझ्यात माझा, माझ्यात तुझा गुंता... तुला न कळले.. मन बावरले' ही गेय कविता सादर करून काव्य रसिकांची वाहवा ..मिळवली.

कवी संमेलनाच्या अध्यक्षा शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांनी, 'या काळजाच्या रेषा, चिमुकल्या डोळ्यांमध्ये स्वप्न उदयाचे साठले...... सावली ग.. गोदामाई.. गोरगरिबांची तू आई, धान्य -धान्यने भरले तू ज्वारीचे कणसे... ही गेय कविता सादर करून सभागृहामध्ये टाळ्यांचा गडगडाट निर्माण केला. या काव्यधारा कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कवयित्री सत्यशीला तौर यांनी केले, तर उपस्थिताचें आभार प्रा. बाबासाहेब खंडागळे यांनी मानलेत.या कवी संमेलनासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच जालना शहरातील काव्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.